दिनांक – १२/०७/२०१७

# प्रस्तावित मूल्यमापन योजना इयत्ता नववी – भूगोल

इयत्ता नववीच्या बदललेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी २०१७ –२०१८ पासून सुरू झाली आहे. अर्थशास्त्राशी संबधीत घटक भूगोलाच्या पाठ्यपुस्तकातून एकात्मिक पध्दतीने दिलेला आहे.

इयत्ता नववीत भूगोल विषयासाठी ४० गुण ठेवण्यात आले आहेत. अंतर्गत मूल्यमापन ही योजना भूगोल (सामाजिक शास्त्रे ) विषयासाठी असणार नाही.

प्रथम सत्र परीक्षा ४० गुण + दवितीय सत्र परीक्षा ४० गुण अशा एकूण ८० गुणांपैकी मिळालेल्या गुणांचे ४० गुणांत रूपांतर करून वार्षिक निकाल द्यावयाचा आहे.

| प्रथम सत्र | दवितीय सत्र |
|---|---|
| भूगोल ४० गुण लेखी परीक्षा | भूगोल ४० गुण लेखी परीक्षा |

दुसऱ्या सत्रातील लेखी परीक्षेला सत्र २ मध्ये अभ्यासावयाच्या सर्व घटकांवर आधारित ८०% प्रश्न व सत्र १ च्या घटकांवर अधारित २०% प्रश्न असावेत. म्हणजे व्दितीय सत्राच्या ४० गुणांच्या लेखी परीक्षेत भूगोलाच्या व्दितीय सत्रातील घटकांना ३२ गुण तर प्रथम सत्रातील घटकांसाठी ८ गुण द्यावेत.

विद्यार्थ्यांची अभ्यासू वृत्ती व गुणवत्ता वाढावी म्हणून प्रत्येक सत्रात घटक चाचणी, प्रकल्प घेण्यात यावेत. मात्र त्यांचे गुण मूल्यमापनासाठी गृहीत धरण्यात येवू नयेत.

**भूगोल विषयासाठी उद्दिष्ठांन्वये केलेली गुण विभागणी.**

| उद्दिष्टे | शेकडा गुण |
|---|---|
| ज्ञान | १० |
| आकलन | ३० |
| उपयोजन | २० |
| संश्लेषण | १० |
| कौशल्य | १० |
| मूल्यमापन | १० |
| सर्जनशीलता | १० |
| एकूण | १०० |

**नववी भूगोल विषयाचे मूल्यमापन प्रश्नपकारानुसार पुढीलप्रमाणे**

| प्रश्न | गुण | विकल्पासह गुण |
|---|---|---|
| प्रश्न १. वस्तुनिष्ठ प्रश्न "बहुपर्यायी"<br>( प्रत्येकी १ गुणांचे प्रश्न ) | ०४ | ०४ |
| प्रश्न २. एका वाक्यात उत्तरे लिहा.<br>( प्रत्येकी १ गुणांचे प्रश्न ) | ०४ | ०४ |
| प्रश्न ३. लघुत्तरी प्रश्न, प्रकार एक (प्रत्येकी २ गुण)<br>(यादी करा/नावे सांगा/फरक सांगा/व्याख्यासांगा/<br>ओळखून लिहा/छायाचित्र आकृती आलेख नकाशावरील,<br>कारणे सांगा/ उत्तरे द्या/प्रकार सांगा, इत्यादी प्रश्न/ दोन<br>– तीन वाक्यात उत्तरे) | ०६ | ०६ |
| प्रश्न ४. लघुत्तरी प्रश्न, प्रकार दोन (प्रत्येकी २ गुण)<br>(आकृती काढा/ आलेख काढा/नकाशा भरा/ नकाशा<br>काढा, नोंद घ्या.) | ०६ | ०६ |
| प्रश्न ५. दीर्घोत्तरी प्रश्न प्रकार एक (प्रत्येकी ३ गुण)<br>(भौगोलिक कारणे लिहा/ स्पष्ट करा. चर्चा करा<br>सहसंबंध लिहा) | १२ | १८ |
| प्रश्न ५. दीर्घोत्तरी प्रश्न प्रकार दोन (प्रत्येकी ४गुण)<br>(रचना लिहा/थोडक्यात उत्तरे लिहा/समस्या सोडवा/ कृती<br>लिहा/ तुलना करा.<br>टीपा लिहा/ उपाय सुचवा | ०८ | १२ |
| **एकूण गुण** | **४०** | **५०** |

# मूल्यमापन योजना
## सामाजिक शास्त्रे
## (इतिहास, राज्यशास्त्र, भूगोल)
## (२०१७)

इयत्ता नववीच्या बदललेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ पासून सुरू झाली आहे. सामाजिक शास्त्रे इयत्ता नववीसाठी इतिहास व राज्यशास्त्र आणि भूगोल अशी दोन स्वतंत्र पाठ्यपुस्तके तयार केली आहेत.

इयत्ता नववीत इतिहास विषयासाठी ४० गुण, राज्यशास्त्र विषयासाठी २० गुण, भूगोल विषयासाठी ४० गुण असे सामाजिक शास्त्र विषयांसाठी एकूण १०० गुण आहेत.

प्रथम सत्र परीक्षा ४० + २० + ४० असे १०० गुण + द्वितीय सत्र परीक्षा ४० + २० +४० असे १०० गुण अशा एकूण २०० गुणांचे वार्षिक मूल्यमापन घ्यावे. तसेच एकूण २०० गुणांना २ ने भागून गुणांची सरासरी काढण्यात यावी.

प्रत्येक सत्रासाठी १०० गुणांची विभागणी खालीलप्रमाणे आहे.

| **प्रथम सत्र** | | **द्वितीय सत्र** | |
|---|---|---|---|
| इतिहास | ४० गुण | इतिहास | ४० गुण |
| राज्यशास्त्र | २० गुण | राज्यशास्त्र | २० गुण |
| भूगोल | ४० गुण | भूगोल | ४० गुण |
| | **१०० गुण लेखी परीक्षा** | | **१०० गुण लेखी परीक्षा** |

**सूचना :**

(१) इतिहास व राज्यशास्त्र विषयाची द्वितीय सत्राची कृतिपत्रिका तयार करत असताना प्रथम सत्रातील आशयाला २०% भारांश देण्यात यावा. म्हणजेच ४८ गुण (८०%), १२ गुण (२०%) अशाप्रकारे गुणांची विभागणी करण्यात यावी. तसेच भूगोलाच्या द्वितीय सत्राच्या ४० गुणांच्या लेखी परीक्षेत द्वितीय सत्रातील घटकांना ३२ गुण तर प्रथम सत्रातील घटकांसाठी ८ गुण द्यावेत.

(२) विद्यार्थ्यांची अभ्यासू वृत्ती व गुणवत्ता वाढावी म्हणून प्रत्येक सत्रात १ घटक चाचणी घेण्यात यावी. मात्र त्याचे गुण अंतर्गत मूल्यमापनासाठी गृहीत धरण्यात येवू नयेत. इतिहासविषयक दृष्टिकोन विकसित होणे तसेच भौगोलिक परिसराविषयी जिज्ञासा निर्माण व्हावी या हेतूने पाठ्यपुस्तकात दिलेल्या उपक्रमावर आधारित उपक्रम घ्यावेत. मात्र चाचणीसारख्या परीक्षांचा आग्रह धरू नये.

**इयत्ता नववी : इतिहास व राज्यशास्त्र**

**(इतिहास : ४० गुण, राज्यशास्त्र : २० गुण) एकूण गुण ६०**

**मूल्यमापन : कृतिपत्रिका आराखडा** **वेळ : 2.30 तास**

## *इतिहास*

| प्र.क्र. | प्रश्नाचे स्वरूप | विकल्प | गुण | विकल्पास गुण |
|---|---|---|---|---|
| प्र.१ | (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा. | – | ०४ | ०४ |
| | (ब) पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखा व लिहा. | – | ०४ | ०४ |
| प्र.२ | (अ) दिलेली संकल्पना चित्रे पूर्ण करा.<br>किंवा<br>(i) दिलेल्या घटकांवर संकल्पना चित्र (concept map) तयार करा.<br>(ii) कालरेषा तयार करा.<br>(iii) दिलेल्या घटकांवर ओघतक्ता (Flow Chart) तयार करा. | ३ पैकी २ | ०४ | ०६ |
| | (ब) पुढील संकल्पना स्पष्ट करा/टीपा लिहा. | ४ पैकी २ | ०४ | ०८ |
| प्र.३ | (अ) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. | ५ पैकी ३ | ०६ | १० |
| | (ब) पुढील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा. | ३ पैकी २ | ०४ | ०६ |
| प्र.४ | दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा. | – | ०४ | ०४ |
| प्र.५ | पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. स्पष्टीकरण करा/तुलना (साम्य-भेद) करा. आजच्या परिस्थितीशी तुलना करा./कल्पनाचित्र तयार करून वैशिष्ट्ये स्पष्ट करा./चित्रावर आधारित प्रश्न. | ४ पैकी २ | १० | १८ |
| | | **गुण** | **४०** | **६०** |

## *राज्यशास्त्र*

| प्र.क्र. | प्रश्नाचे स्वरूप | विकल्प | गुण | विकल्पास गुण |
|---|---|---|---|---|
| प्र.६ | दिलेली विधाने उत्तरपत्रिकेत लिहून त्यापुढे योग्य पर्याय लिहा. | – | ०४ | ०४ |
| प्र.७ | पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. | ३ पैकी २ | ०४ | ०६ |
| प्र.८ | (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा./टीपा लिहा.<br>(ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. | ३ पैकी २<br>३ पैकी २ | ०४<br>०४ | ०६<br>०६ |
| प्र.९ | पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. उपयुक्तता स्पष्ट करा. तुलना (साम्य-भेद) करा./आजच्या परिस्थितीशी तुलना करा./तुमचे मत व्यक्त करा. | ४ पैकी २ | ०४ | ०८ |
| | | **गुण** | **२०** | **३०** |

## प्रश्नप्रकारानुसार गुण विभागणी

### इतिहास

| क्र. | प्रश्नप्रकार | गुण | विकल्प | शतमान |
|---|---|---|---|---|
| १. | वस्तुनिष्ठ | ०८ | ०८ | २०% |
| २. | लघुत्तरी | २२ | ३४ | ५५% |
| ३. | दीर्घोत्तरी | १० | १६ | २५% |
| | **एकूण** | **४०** | **६०** | **१००%** |

### राज्यशास्त्र

| क्र. | प्रश्नप्रकार | गुण | विकल्प | शतमान |
|---|---|---|---|---|
| १. | वस्तुनिष्ठ | ०४ | ०४ | २०% |
| २. | लघुत्तरी | १२ | १८ | ६०% |
| ३. | दीर्घोत्तरी | ०४ | ०८ | २०% |
| | **एकूण** | **२०** | **३०** | **१००%** |

## उद्‌दिष्टांनुसार गुण विभागणी

### इतिहास

| क्र. | प्रश्नप्रकार | गुण | विकल्प | शतमान |
|---|---|---|---|---|
| १. | ज्ञान | २० | ३० | ५०% |
| २. | आकलन | १० | १२ | २५% |
| ३. | उपयोजन | १० | १८ | २५% |
| | **एकूण** | **४०** | **६०** | **१००%** |

### राज्यशास्त्र

| क्र. | प्रश्नप्रकार | गुण | विकल्प | शतमान |
|---|---|---|---|---|
| १. | ज्ञान | १० | १४ | ५०% |
| २. | आकलन | ०४ | ०६ | २०% |
| ३. | उपयोजन | ०६ | १० | ३०% |
| | **एकूण** | **२०** | **३०** | **१००%** |

## प्रकरणानुसार गुण विभागणी : इयत्ता नववी
# इतिहास

**प्रथम सत्र**

| क्र. | प्रकरणाचे नाव | गुण | विकल्प |
|---|---|---|---|
| १. | इतिहासाची साधने | ०४ | १० |
| २. | भारत : १९६० नंतरच्या घडामोडी | ०८ | १० |
| ३. | भारतापुढील अंतर्गत आव्हाने | ०८ | १० |
| ४. | आर्थिक विकास | १० | १५ |
| ५. | शैक्षणिक वाटचाल | १० | १५ |
| | **एकूण गुण** | **४०** | **६०** |

**द्‌वितीय सत्र**

| क्र. | प्रकरणाचे नाव | गुण | विकल्प |
|---|---|---|---|
| ६. | महिला व अन्य दुर्बल गटकांचे सक्षमीकरण | ०६ | ११ |
| ७. | विज्ञान व तंत्रज्ञान | ०९ | १२ |
| ८. | उद्योग व व्यापार | ०९ | १३ |
| ९. | बदलते जीवन : भाग १ | ०८ | १२ |
| १०. | बदलते जीवन : भाग २ | ०८ | १२ |
| | **एकूण गुण** | **४०** | **६०** |

# राज्यशास्त्र

**प्रथम सत्र**

| क्र. | प्रकरणाचे नाव | गुण | विकल्प |
|---|---|---|---|
| १. | महायुद्‌धोत्तर राजकीय घडामोडी | ०८ | १० |
| २. | भारताच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल | ०६ | ०९ |
| ३. | भारताची सुरक्षा व्यवस्था | ०६ | ०९ |
| | **एकूण गुण** | **२०** | **२८** |

**द्‌वितीय सत्र**

| क्र. | प्रकरणाचे नाव | गुण | विकल्प |
|---|---|---|---|
| ४. | संयुक्त राष्ट्रे | ०७ | १० |
| ५. | भारत व अन्य देश | ०७ | १० |
| ६. | आंतरराष्ट्रीय समस्या | ०६ | ०८ |
| | **एकूण गुण** | **२०** | **२८** |

# इतिहास

## प्रथम सत्र

| क्र. | प्रकरणाचे नाव | गुण | विकल्प |
|---|---|---|---|
| १. | इतिहासाची साधने | ०४ | १० |
| २. | भारत : १९६० नंतरच्या घडामोडी | ०८ | १० |
| ३. | भारतापुढील अंतर्गत आव्हाने | ०८ | १० |
| ४. | आर्थिक विकास | १० | १५ |
| ५. | शैक्षणिक वाटचाल | १० | १५ |
| | **एकूण गुण** | **४०** | **६०** |

## द्वितीय सत्र

| क्र. | प्रकरणाचे नाव | गुण | विकल्प |
|---|---|---|---|
| ६. | महिला व अन्य दुर्बल गटकांचे सक्षमीकरण | ०६ | ११ |
| ७. | विज्ञान व तंत्रज्ञान | ०९ | १२ |
| ८. | उद्योग व व्यापार | ०९ | १३ |
| ९. | बदलते जीवन : भाग १ | ०८ | १२ |
| १०. | बदलते जीवन : भाग २ | ०८ | १२ |
| | **एकूण गुण** | **४०** | **६०** |

**राज्यशास्त्र**

**प्रथम सत्र**

| **क्र.** | **प्रकरणाचे नाव** | **गुण** | **विकल्प** |
|---|---|---|---|
| १. | महायुद्धोत्तर राजकीय घडामोडी | ०८ | १० |
| २. | भारताच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल | ०६ | ०९ |
| ३. | भारताची सुरक्षा व्यवस्था | ०६ | ०९ |
| | एकूण गुण | २० | २८ |

**द्वितीय सत्र**

| **क्र.** | **प्रकरणाचे नाव** | **गुण** | **विकल्प** |
|---|---|---|---|
| ४. | संयुक्त राष्ट्रे | ०७ | १० |
| ५. | भारत व अन्य देश | ०७ | १० |
| ६. | आंतरराष्ट्रीय समस्या | ०६ | ०८ |
| | एकूण गुण | २० | २८ |

**इयत्ता नववी इतिहास–राज्यशास्त्र**

**प्रथम सत्र परीक्षा**

**कृतीपत्रिका**

**वेळ २.३०** **एकूण गुण–६०**

---

**प्रश्न १ अ) दिलेल्या पर्यायापैकी योग्य निवडून उत्तरपत्रिकेत लिहा. (गुण ४)**

१) रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मुख्यालय .................... येथे आहे.
अ) पुणे ब) मुंबई क) दिल्ली ड) कोलकाता

२) भारतीय हरितक्रांतीचे जनक .................
अ) डॉ. वर्गीस कुरीसन ब) डॉ. होमी भाभा
क) डॉ. एम. एस. स्वामीनाथ्न ड) काकासाहेब कालेलकर

३) ईशान्य भारतातील ................. ही जमात लढाऊ जमात म्हणून ओळखली जाते.
अ) शीख ब) नागा क) आसामी ड) बंगाली

४) भारताचे पहिले शिक्षणमंत्री ..............
अ) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन ब) डॉ. मौलाना अबुल कलाम आझाद
क) डॉ. डी. एस. कोठारी ड) इंदिरा गांधी

**ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व लिहा. (गुण ४)**

१) अ) लिखीत साधन – रोजनिशी
ब) राष्ट्रीय अभिलेखागार – नवी दिल्ली
क) रिझर्व्ह बँकेचे संग्रहालय – पुणे
ड) मौखिक साधन – पत्रव्यवहार

२) अ) इंदिरा गांधी – चीनबरोबर संवाद
ब) भिंद्रानवाले – अकाल तख्त
क) राजीव गांधी – विज्ञान तंत्रज्ञान सुधारणा
ड) अटलबिहारी वाजपेयी – पाकिस्तानशी संवाद

३) अ) पं. जवाहरलाल नेहरू – प्रधानमंत्री
ब) लालबहादुर शास्त्री – प्रधानमंत्री
क) जयप्रकाश नारायण – प्रधानमंत्री
ड) मोरारजी देसाई – प्रधानमंत्री

४) अ) झापू फिझो – नागा नॅशनल कौन्सिल


ब) लाल डेंगा – मिझो नॅशनल फ्रंट

क) लाला जगतनारायण – संपादक


ड) अकाली दल – स्वतंत्र नागालँड राष्ट्राची मागणी

**प्रश्न २) अ) दिलेली संकल्पना चित्रे पूर्ण करा. (कोणतेही दोन)** **(गुण ४)**


१)




२)




३)



**ब) दिलेली संकल्पना स्पष्ट करा. (कोणतेही दोन)** **(गुण ४)**

१) जमातवाद

२) जागतिकीकरण

३) मिश्र अर्थव्यवस्था

४) धर्मांधता

**प्रश्न ३) अ) पुढील विधाने सकारण करा. (कोणतेही तीन)** **(गुण ६)**

१) मोरारजी देसाई यांचे सरकार अल्पकाळच टिकले.

२) 'ऑपरेशन ब्लू स्टार' करावे लागले.

३) गिरणी कामगार संपावर गेले.

४) जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आले.

५) स्वतंत्र भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला.

**ब) पुढील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **(गुण ४)**

१) 'आनंदपूर साहिब' या ठरावात अकाली दलाने कोणत्या मागण्या केल्या?

२) 'मौखिक साधनांची माहिति लिहा.

३) जागतिक व्यापार संघटनेबद्दल माहिती लिहा.

**प्रश्न ४) दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(गुण ४)**

विकासातील असमतोलामुळे प्रदेशवादाला खतपाणी मिळते. ब्रिटिश राजवटीमध्ये भारताच्या आर्थिक विकासात असमतोल निर्माण झाला. स्वातंत्र्यानंतरही देशाचा आर्थिक विकास साधताना काही राज्यांची अधिक प्रगती झाली तर इतर राज्ये आर्थिकदृष्ट्या मागासच राहिली. उदा., महाराष्ट्र, गुजरात, पंजाब, तमिळनाडू आर्थिक व औद्योगिकदृष्ट्या बरीच विकसित झाली. तर ओडिशा, बिहार, आसामसारखी राज्ये आर्थिक व औद्योगिकदृष्ट्या अप्रगत राहिली. आर्थिक विकास व सुधारणा हा प्रगतीचा पाया असल्याने ज्या राज्यांत आर्थिक विकास होतो ती राज्ये शिक्षण, आरोग्य, संस्कृती या अन्न क्षेत्रांतही प्रगती साधू शकतात. ज्या राज्यांत असा विकास झालेला नसतो ती राज्ये खूपच मागे राहतात. प्रगत राज्यांतील लोकांना उपलब्ध होणाऱ्या विकासाच्या संधी अशा राज्यांना मिळत नाहीत. शैक्षणिक मागासलेपणा, बेरोजगारी, दारिद्र्य अशा प्रश्नांनी ते गांजले जातात. आपली फसवणूक होत आहे. आपल्याला विकासाच्या लाभांपासून दूर ठेवले जात आहे, अशी भावना त्यांच्या मनात बळावते. यातूनच मग राज्याराज्यांतील सलोखा नष्ट होतो. हा सलोखा नष्ट झाला तर त्याचा विपरीत परिणाम राष्ट्रीय ऐक्यावर होतो. त्यासाठी हा सलोखा ज्यामुळे नष्ट होतो, त्या आर्थिक असमतोलाचा प्रश्न आपण तातडीने सोडवायला हवा. आपले सरकार त्या दृष्टीने प्रयत्नशील आहे.

**१) तक्ता पूर्ण करा.**

| | | |
|---|---|---|
| अ) | भारतातील आर्थिक व औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्ये. | -------------- |
| आ) | भारतातील आर्थिक व औद्योगिकदृष्ट्या अप्रगत राज्ये. | -------------- |

**२) अविकसित राज्ये कोणकोणत्या क्षेत्रात मागे राहतात?**

**३) विकासातील असमतोल राष्ट्रीय ऐक्यावर विपरित परिणाम कसा करतो हे स्पष्ट करा.**

**प्रश्न ५) पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (गुण १०)**

१) इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापिठाचे शैक्षणिक योगदान स्पष्ट करा.

२) बँकांच्या राष्ट्रीयीकरणाविषयी सविस्तर माहिती लिहा.

३) नक्षलवादी चळवळीचा आढावा घ्या.

४) १९६० नंतर सामाजिक क्षेत्रात झालेल्या बदलांविषयी माहिती लिहा.

## राज्यशास्त्र

**प्रश्न ६) दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून उत्तरपत्रिकेत लिहा. (गुण ४)**

१) पहिल्या महायुद्धानंतर शांतता प्रस्थापित करण्यासाठी ........... ची स्थापना झाली.
अ) राष्ट्रसंघ ब) संयुक्त राष्ट्रे क) नाटो ड) असियान

२) भारताच्या परराष्ट्र धोरणात ........ बाब प्रामुख्याने महत्त्वाची आहे.
अ) मुक्त आर्थिक धोरण ब) परस्परावलंबन क) अलिप्तवाद ड) अण्विक विकास

३) शीतयुद्ध .............. या घटनेमुळे संपले.
अ) संयुक्त राष्टाची स्थापना ब) सोव्हिएत युनियनचे विघटन
क) लष्करी संघटनांची निर्मिती ड) क्यूबाचा संघर्ष

४) भारताचे .............. हे संरक्षक दलाचे सरसेनापती असतात.
अ) प्रधानमंत्री ब) राष्ट्रपती क) संरक्षणमंत्री ड) राज्यपाल

**प्रश्न ७) खाली दिलेली विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. (गुण ४)**

१) पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाची निर्मिती झाली.

२) पंडित नेहरूंनी भारत-चीन संबंध सुधारण्यात मोठे योगदान दिले.

३) भारत आणि पाकिस्तान यांच्यात कोणतेच वादग्रस्त प्रश्न नाहीत.

**प्रश्न ८) अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा. (कोणतेही दोन) (गुण ४)**

१) शीतयुद्ध
२) अलिप्ततावाद
३) राष्ट्रीय सुरक्षा

**ब) संकल्पना चित्र/ओघ तक्ता तयार करा. (कोणतेही दोन) (गुण ४)**

१) परराष्ट्र धोरण निश्चित करणारे घटक
२) भारताच्या सुरक्षिततेपुढील आव्हाने
३) शीत-युद्धाचे परिणाम

**प्रश्न ९) पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (गुण ४)**

१) भारताचे परराष्ट्र धोरण कोणत्या मूल्यांवर आधारित आहे?
२) सीमा सुरक्षा दलाची कार्ये लिहा.
३) 'शांततेसाठी अणुशक्ती' यावर तुमचे मत व्यक्त करा.
४) शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर जागतिक राजकारणात कोणते महत्त्वाचे बदल घडून आले?

***